दि. २७.०२.२०२४

**प्रेस नोट**

**आरोपी लोकसेवक क्र १ हिरालाल गणपतराव निंबाळकर, वय ५७ वर्षे, पद– पशुधन विकास अधिकारी, वर्ग १, नेमणुक– पशुधन विकास अधिकारी कार्यालय (विस्तार), औसा ता.औसा जि. लातूर, रा. टिळक चौक, दाबका वेस, निलंगर जि.लातुर, आरोपी इतर लोकसेवक क्र २ माधव संग्राम येवतीकर, वय २९ वर्षे, पद– संगणक परिचालक, ग्रामपंचायत कार्यालय, उंबडगाव (बु.), इलोसे , रा. याकतपुर रोड, महादेव नगर, औसा जि.लातुर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेवक क्र १ हिरालाल गणपतराव निंबाळकर, पद– पशुधन विकास अधिकारी व आरोपी इतर लोकसेवक क्र २ माधव संग्राम येवतीकर, पद– संगणक परिचालक यांनी तक्रारदार व त्यांच्या आईच्या नावे मौजे सत्तधरवाडी ता.औसा जि. लातूर येथील सर्वे नंबर ४२ ब मधील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत पशुधन गोठयाचा प्रस्ताव पुढे पाठविण्यासाठी व त्याचे पैसे मंजुर करण्यासाठी आरोपी लोकसेवक क्र.१यांनी १,०००/– रूपये लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार काल दि. २६/०२/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून आज दि. २७/०२/२०२४ रोजी शासकीय पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता आलोसे क्र १ यांनी १,०००/–रू. तक्रारी प्रमाणे लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम इलोसे क्र.२ यांचेकडे देण्यास सांगितल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

त्यानुसार लागलीच आज दि. २७/०२/२०२४ रोजी तक्रारदार हे लाचेची रक्कम देण्यासाठी पंचायत समिती, औसा येथील आवारात गेले असता इलोसे क्र २ येवतीकर यांनी पंचायत समिती कार्यालयाच्या पाठीमागील मोकळया जागेमध्ये शासकीय पंचासमक्ष लाचेची रक्कम स्वत: स्विकारली त्यावेळी इलोसे क्र.२ यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहाथ पकडण्यात आले. तसेच आलोसे क्र. १ हिरालाल गणपतराव निबांळकर यांना अंबेजोगाई जि.बीड येथुन ताब्यात घेण्यात आले आहे.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक क्र १ हिरालाल गणपतराव निंबाळकर, पद– पशुधन विकास अधिकारी व आरोपी इतर लोकसेवक क्र २ माधव संग्राम येवतीकर, पद– संगणक परिचालक यांचे विरूध्द पोलीस स्टेशन औसा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे. सदर गुन्हयाचा तपास श्री. संतोष बर्गे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड व मा. रमेशकुमार स्वामी, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक संतोष बर्गे, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/फारूक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, भिमराव आलुरे, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, पोकॉ/संदिप जाधव, पोकॉ/दिपक कलवले, पोकॉ/गजानन जाधव, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०९६२३९९९९४४ |
| २) | श्री. संतोष बर्गे, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक ०७७४४८१२५३५ |
| ३) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– | ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– | www.facebook.com/maharashtraACB |
| ८) | Twitter | :– | ACBlatur |
| ९) | Instagram | :– | Acblatur |
| १०) | YouTube Channel | :– | anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर